**अर्जदारातर्फे सा.क्र. २ यांचा पुढील सरतपास अर्जदाराचे वकिल श्री डी.एम. कुटे यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

**१५.** मी या प्रकरणात माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.

**१६.** आता मला निशाणी ५७ या कागदपत्राच्या यादीसोबत दाखल असलेली अ.क्र. १ ची दि नांदुरा अर्बन को.ऑप. बॅंक लि. नांदुरा चे सेव्हींग खात्यामध्ये रूपये २,००,०००/— जमा केल्याबाबतची पावती दाखविण्यात आली. ती पावती माइया हस्ताक्षरात असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी ५९** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. २ व ३ ला माझे आयडीबीआय बॅंक, शाखा अकोट येथे असलेल्या दोन खात्यांचे मुळ पासबुक दाखल केले आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी ६० व ६१** देण्यात येते. ( सदर पासबुकला निशाणी देण्यास गैरअर्जदाराच्या वकीलांनी हरकत घेतली. सदर हरकत अंतीम युक्तीवादापर्यंत राखुन ठेवुन देण्यात आलेली निशाणी प्रशासकीय कारणापुरती कायम ठेवण्यात येत आहे.)
**सरतपास पूर्ण.**

**गैरअर्जदाराचे वकिल श्री. एन.आर.राठी यांच्या तोंडी विनंती वरून उलटतपासणीसाठी शेवटची संधी म्हणुन प्रकरण पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दिनांक १६.०२.२०२६.

( महेश एस. काळे )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अकोट.